# Washim District Police

**Nature of Work** :- Recovery of stole property

**Police Station** :- Shirpur

**Date of Good Work done** :- 08/11/2022

**Brief of the work done :-**

# दोन आरोपींसह सात दुचाकी जप्त

## शिरपूर जैन, मेहकर पोलिसांनी संयुक्तपणे केली कारवाई



शिरपूर जैन (वा). दोन आरोपींकडून सात मोटरसायल जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई शिरपूर जैन व मेहकर पोलिसांच्यावतीने 7 नोव्हेंबर रोजी करण्यात आली.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार मेहकर येथे दाखल गुन्ह्याचा तपास करण्यासाठी मेहकर पोलिस स्टेशनचे एक पथक शिरपूर जैन येथे दाखल होऊन सदर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिस अधीक्षक बच्चन सिंह व अप्पर पोलिस अधीक्षक गोरख भांमरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनात शिरपूर जैन पोलिस स्टेशनचे नापोशि श्रीकृष्ण नारगे, पोशि. विनोद घनवट यांच्या मदतीने पांगरखेडा येथून संशयीत आरोपी रंधवा पवार व सुरज रंधवा पवार या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता सुरज पवार याने राहूल पवार व इतर दोन आरापींचा अहभाग सदर गुन्ह्यात असल्याचे सांगितले. त्यावरून मेहकर पोलिस स्टेशन येथून पोउपनि घुगे, पाउपनि रवि मोरे यांनी शिरपूर पोलिस स्टेशनचे पाउपनि साठे, सपोउपनि प्रकाश सरनाई, नापोशि श्रीकृष्ण नागरे, पोशि प्रवीण शेंद्रे, प्रवीण गोपनारायण, विनोद घनवट, विनोद जायभाये, विलास पवार यांनी चांडस येथून एक आरोपी व शिरपूर येथून एक आरोपी ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदर आरोपींकडून सात चोरीच्या मोटरसायकली जप्त करून आरोपीला मेहकर येथे अधिक चौकशीकरिता घेऊन गेले. पोलिस स्टेशन अंतर्गत चोरीच्या घटनेबाबत माहिती असल्यास शिरपूर पोलिस स्टेशनला माहिती द्यावी, माहिती देणारांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, त्यामुळे नागरिकांनी चोरीच्या घटनेबाबत माहिती द्यावी, असे आवाहन शिरपूर जैन पोलिस स्टेशनचे ठाणेदार सुनील वानखेडे यांनी केले आहे.